


# शालेय शिक्षण विभाग

## अर्थसंकल्प : २०२६-२७

## महाराष्ट्र शासन

## ₹८९,२४० कोटी

**समर्थन अर्थसंकल्प**
**अध्ययन केंद्र**

१०५ लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरीन लाईन्स (पू.) मुंबई- ४०० ०२० ☏०२२-२२००३०६०
✉: samarthanmumbai97@gmail.com www.samarthanadvocacy.org

## समर्थन

**संस्थापक अध्यक्ष : स्व. सदानंद वर्दे**

**संस्थापक : श्री. विवेक पंडित**

**अध्यक्ष : ॲड (डॉ.) अशोक येंडे**

**उपाध्यक्ष : श्री. आशिष कुलकर्णी**

**कार्याध्यक्ष : श्री. संतोष पाटील**

**सचिव : डॉ. आशिष भोसले**

**संपादक : मुक्ता भारती व हिंदप्रभा कर्वे**
**विश्लेषण आणि संकलन :**
**रुपेश कीर - ९८९२९३९६१७**

**विशेष सहाय्य :**
स्नेहा घरत, विलास सुर्वे,
निलम काकड, उमेश सांगळे, प्रज्योत म्हादये व
राजेश्री कदम

**नोंदणी क्रमांक :**

**पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र. एफ - १८९०३, मुंबई**

**सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई**
**१५६७/९६ जीबीबीएसडी**

**प्रकाशक (प्रत्रव्यवहार):**
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई - ४०० ०२०



**Email :** samarthanmumbai97@gmail.com
**website :** www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरीता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन' राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी देणे.
- प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे...

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपण्याचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१८-१९ पासून २०२४-२५ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२५-२६ सुधारित अंदाज तसेच २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्या ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्य.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागावर टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिध्द करण्यात येईल.

**विश्लेषण आणि संकलन :**
**रुपेश कीर - ९८९२९३९६१७**

**मार्गदर्शक - विवेक पंडित**
**संस्थापक, समर्थन**

# आर्थिक पाहणीतील, शालेय शिक्षणाची ठळक वैशिष्टये

## राज्यातील प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांचे वास्तव

### प्राथमिक शाळांची स्थिती:

- एकूण १ लाख ४ हजार ५२६ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांपैकी १५ हजार ५१ (१४.४%) शाळांना संरक्षक भिंत नाही.
- २८ हजार ११८ (२६.९०%) प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना संगणक व्यवस्था पोहोचली नाही.
- १३ हजार १७१ (१२.६%) शाळांना खेळाचे मैदानच नाही.
- ७ हजार १०८ (६.८०%) शाळांना ग्रांथालये नाहीत.
- ५ हजार ५४० (५.३%) शाळांना विद्युत जोडणी नाही.
- ४ हजार १८ (०.४%) शाळांमध्ये अद्याप पिण्याच्या पाण्याची सोय नाही.
- ५२२ (०.५%) प्राथमिक शाळांना मुलींकरिता कार्यरत शौचालय सुविधा नाही.

### माध्यमिक व उच्च शाळांची स्थिती:

- २९ हजार ६४१ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत.
- १ हजार ३९४ (४.७%) माध्यमिक शाळांना संरक्षण भिंत नाही.
- १ हजार ४२३ (४.८%) शाळांना खेळाचे मैदान नाही.
- १ हजार ८ (३.४%) शाळांना ग्रंथालये नाहीत.
- १ हजार ३०५ (४.४०%) शाळांना संगणक नाहीत.
- २ हजार ५५० (८.६०%) शाळांना दिव्यांगांसाठी उतरंड नाही.
- ८९० (३%) शाळांना मुलींकरीता शौचालयाची सुविधा नाही.

- AI सारखे तंत्रज्ञान जगात विकसित होत असताना शासनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक मिळून ३ हजार २९१ (११.१%) शाळांमध्ये संगणक व इंटरनेटची प्राथमिक सुविधाही उपलब्ध नाही.
- सन २०२३-२४ मध्ये राज्य मंडळाच्या १३ हजार ६५५ शाळा होत्या, सन २०२४-२५ मध्ये राज्य मंडळाच्या ८७ शाळा कमी होऊन त्यांची संख्या १३ हजार ५६८ झाली आहे, त्याच प्रमाणे वर्ष २०२३-२४ मध्ये राज्य मंडळ व सीबीएसई च्या शाळा १५ होत्या तर वर्ष २०२४-२५ मध्ये ती संख्या १ वर आली आहे, २०२४-२५ मध्ये सीबीएसई च्या शाळा १ हजार २६०, आय.सी.एस.ई/ आय.जी.सी.एस.ई/ आय.बी/ इतर ३८९ अशा एकूण १५ हजार २१८ शाळा असून त्यापैकी मराठी शाळा २ हजार १० असून त्याच प्रमाणे केवळ १३.२०% आहे.

# ‘यूडीआयएसई+ (UDISE+) २०२४-२५’ अहवालातील महाराष्ट्रातील शैक्षणिक स्थितीचे विश्लेषण

## १. शाळा, विद्यार्थी आणि शिक्षक: संख्यात्मक स्थिती:

महाराष्ट्रात एकूण शाळांची संख्या १ लाख ८ हजार २५० असून त्यात २ कोटी १२ लाख ७२ हजार ६११ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

- **पुरवठा आणि मागणीचे व्यस्त प्रमाण:** महाराष्ट्रात उपलब्ध शाळांच्या तुलनेत विद्यार्थ्यांची पटसंख्या लक्षणीयरीत्या जास्त आहे. हे दर्शवते की महाराष्ट्रात उपलब्ध शाळांचा वापर क्षमतेपेक्षा जास्त होत आहे, तर उत्तर प्रदेश आणि राजस्थान सारख्या राज्यांत शाळांची संख्या अधिक असूनही विद्यार्थ्यांचे प्रमाण त्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे महाराष्ट्रात शाळांची संख्या वाढवणे जास्त गरजेचे आहे.

## २. पटनोंदणी गुणोत्तर (GER) - तुलनात्मक विश्लेषण:

महाराष्ट्राचे पटनोंदणी गुणोत्तर (Gross Enrolment Ratio) देशाच्या सरासरीपेक्षा सरस आहे:

- **प्राथमिक स्तर:** महाराष्ट्र १०४.५ (देश: ९०.९). असून १०० टक्क्या पेक्षा जास्त विद्यार्थी शाळेत आलेत.
- **माध्यमिक स्तर:** महाराष्ट्र ९३.६ (देश: ७८.७), असून ६.४ टक्के इतकी गळती होत असल्याचे दिसते.
- **उच्च माध्यमिक स्तर:** महाराष्ट्र ७०.८ (देश: ५८.४). असून २९.२ इतकी गळती होते.

प्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंत महाराष्ट्राने १००% च्या जवळ पोहोचून चांगली कामगिरी केली आहे. मात्र, उच्च माध्यमिक स्तरावर हे प्रमाण ७०.८% पर्यंत खाली येते, जे शिक्षणाच्या गळतीचे निदर्शक आहे, २९.२ इतके विद्यार्थी शाळा सोडतात.

## ३. शिक्षक-विद्यार्थी प्रमाण (PTR): एक गंभीर आव्हान:

महाराष्ट्रातील सर्वात कमकुवत बाजू म्हणजे शिक्षक-विद्यार्थी प्रमाण (Pupil-Teacher Ratio).

- **प्राथमिक:** २४ (देश: २०), विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक
- **उच्च माध्यमिक:** ३७ (देश: २३), एक शिक्षक असणे हे शिक्षक कमी असण्याचे हे गंभीर लक्षण आहे.

आरटीई (RTE) नियमांनुसार हे प्रमाण ३०:१ असणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रात उच्च माध्यमिक स्तरावर एका शिक्षकावर ३७ विद्यार्थ्यांचा भार आहे, जे राष्ट्रीय सरासरीपेक्षा (२३) खूप जास्त आहे. मात्र केरळ (२०) आणि तामिळनाडू (२१) सारख्या राज्यांनी हे प्रमाण नियंत्रणात ठेवले आहे. हे महाराष्ट्रातील शिक्षकांच्या कमतरतेकडे अंगुलीनिर्देश करते.

## ४. पायाभूत सुविधांचे विश्लेषण:.

- **डिजिटल पुढाकार:** संगणक सुविधेच्या बाबतीत महाराष्ट्र (८२.५%) देशाच्या सरासरीपेक्षा (६४.७%) बराच पुढे आहे. मात्र, इंटरनेट सुविधेमध्ये महाराष्ट्र (७२.१%) केरळ (९१.७%) पेक्षा मागे आहे.
- **मुलींसाठी स्वच्छतागृहे:** महाराष्ट्रात ९६.८% शाळांत कार्यान्वित स्वच्छतागृहे आहेत, जे राष्ट्रीय सरासरीच्या (९७.३%) जवळपास आहे.

## ५. गळती (Dropout) आणि टिकून राहण्याचे प्रमाण (Retention Rate):

- **गळतीचा दर:** प्राथमिक स्तरावर महाराष्ट्रात गळतीचे प्रमाण ०% आहे, जे अत्यंत प्रशंसनीय आहे. मात्र, माध्यमिक स्तरावर गळतीचे प्रमाण ११.५% वर पोहोचते, जे राष्ट्रीय सरासरीइतकेच आहे.
- **रिटेन्शन रेट:** उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांचे टिकून राहण्याचे प्रमाण महाराष्ट्रात ६६.५% आहे, जे देशाच्या ४७.२% पेक्षा अधिक आहे.
- **राज्यातील प्रवेश (Gross Enrollment Ratio) प्रक्रिया:** इतर राज्याच्या तुलनेत चांगली असली तरी उच्च माध्यमिक स्तरावर त्यात अजून वाढ करण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक शिक्षण स्तरावर शिक्षक संख्यांची स्थिती चिंताजनक आहे. संगणक आणि पिण्याच्या पाण्याची सोय अनेक शाळामध्ये करून ती सुधारणे गरजेचे आहे. शाळेतील विद्यार्थीच्या गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी प्राथमिक स्तरावर यश येत असेल तरी माध्यमिक स्तरावरील ११.५ % गळती रोखण्याचे आव्हान आहे.

थोडक्यात सांगायचे तर, महाराष्ट्र शैक्षणिक प्रवेश आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये आघाडीवर असला तरी, शिक्षकांची रिक्त पदे भरून 'शिक्षक-विद्यार्थी प्रमाण' सुधारणे आणि माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गळती रोखणे यावर राज्याला अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

## ६. शाळांचे व्यवस्थापन आणि अवलंबित्व (School Management):

- **खाजगी अनुदानीत शाळांचे प्राबल्य:** महाराष्ट्रात २४ हजार ४०६ खाजगी अनुदानीत शाळा आहेत. उत्तर प्रदेश (८,२६२) किंवा राजस्थान (०) सारख्या राज्यांच्या तुलनेत हे प्रमाण खूप मोठे आहे. याचा अर्थ असा की, महाराष्ट्र सरकार स्वतःच्या शाळा चालवण्याऐवजी खाजगी संस्थांना अनुदान देऊन शिक्षण प्रसार करण्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.

## ७. शिक्षकांचे लिंग गुणोत्तर आणि सक्षमीकरण

शिक्षकांच्या बाबतीत महाराष्ट्राची स्थिती प्रगत राज्यांच्या जवळ जाणारी आहे:

- **महिला शिक्षिकांची अधिक संख्या:** महाराष्ट्रात एकूण ७ लाख ४७ हजार ५०१ शिक्षकांपैकी ३ लाख ८९ हजार ३६४ महिला शिक्षिका आहेत, तर पुरुष शिक्षकांची संख्या ३ लाख ५८ हजार १३७ आहे. प्राथमिक स्तरावर महिला शिक्षिकांचे हे प्रमाण अधिक आहे, जे राष्ट्रीय स्तरावर शिक्षणाचे 'स्त्रीकरण' (Feminization of education) आणि सुसह्य शैक्षणिक वातावरणाचे निदर्शक मानले जाते.
- **शिक्षक प्रशिक्षण:** महाराष्ट्रातील ९६% पेक्षा जास्त शिक्षक प्रशिक्षित (Trained) आणि व्यावसायिकदृष्ट्या पात्र (Professionally Qualified) आहेत. गुणवत्तेच्या बाबतीत ही एक जमेची बाजू आहे. राज्यातील ९६% शिक्षक प्रशिक्षित आणि व्यावसायिक दृष्ट्या पात्र आहेत, मात्र अजूनही २९ हजार ९०१ (४%) शिक्षकांचे ट्रेनिंग/प्रशिक्षण झाले नाही.

## ८. डिजिटल दरी (The Digital Divide): एक गंभीर निरीक्षण

- **सरकारी शाळांमधील आयसीटी (ICT) लॅब:** महाराष्ट्रातील सरकारी शाळांपैकी केवळ ४.९% शाळांमध्ये आयसीटी लॅब उपलब्ध आहेत.
- **तुलनात्मक स्थिती:** राष्ट्रीय स्तरावर सरकारी शाळांमध्ये हे प्रमाण २५.६% आहे. केरळ (५९%) आणि तामिळनाडू (९२.२%) यांसारखी राज्ये महाराष्ट्राच्या तुलनेत या बाबतीत कितीतरी पटीने पुढे आहेत. 'डिजिटल महाराष्ट्र'च्या दाव्यांना ही आकडेवारी छेद देते आणि सरकारी शाळांमधील तंत्रज्ञानाच्या अभावावर प्रकाश टाकते.

## ९. सामाजिक समावेशकता (Social Inclusion):

पटनोंदणीमध्ये सामाजिक गटांचे प्रमाण महाराष्ट्राच्या सामाजिक संरचनेशी सुसंगत आहे:

- **OBC आणि अल्पसंख्याक:** एकूण पटसंख्येमध्ये OBC विद्यार्थ्यांचे प्रमाण ३३.१% आणि मुस्लिम विद्यार्थ्यांचे प्रमाण १४.१% आहे.
- **SC/ST गट:** अनुसूचित जाती (SC) १२.३% आणि अनुसूचित जमाती (ST) ११.३% विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तथापि, अनुसूचित जमाती (ST) गटाचा पटनोंदणी दर (GER) प्राथमिक स्तरावर १०६.५% असला तरी माध्यमिक स्तरावर तो खाली येताना दिसतो, जे आदिवासी क्षेत्रातील गळतीचे संकेत आहेत.

## १०. शाळेचा आकार आणि गर्दी (Enrolment Brackets):

- **एकल शिक्षक शाळा:** राज्यात अजूनही ८ हजार १५२ शाळा अशा आहेत जिथे केवळ एकच शिक्षक संपूर्ण शाळा सांभाळतो. १ लाख ५० लाख विद्यार्थी अशा एकल शिक्षक शाळांवर अवलंबून आहेत, जे शैक्षणिक गुणवत्तेसाठी मोठे आव्हान आहे.

## ११. शिक्षकांचे विषम वाटप:

उच्च माध्यमिक स्तरावर ३७:१ हे विद्यार्थी-शिक्षक प्रमाण हे सूचित करते की नवीन पदभरतीची नितांत गरज आहे, अन्यथा केवळ पायाभूत सुविधा असूनही गुणवत्तेत आपण मागे पडू.

थोडक्यात, महाराष्ट्राने शिक्षणाची दारे सर्वांसाठी उघडली असली तरी, 'सरकारी शाळांचे आधुनिकीकरण' आणि 'पुरेशा शिक्षक संख्येद्वारे गुणवत्ता वाढवणे' या दोन आघाड्यांवर राज्याला मोठी मजल मारायची आहे.

## १२. व्यवस्थापन आणि पटसंख्या; एक विरोधाभास:

महाराष्ट्रातील शाळांच्या वितरणात आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या कलानुसार एक मोठा विरोधाभास दिसून येतो:

- **सरकारी शाळा वि. खाजगी पटसंख्या:** राज्यातील एकूण शाळांपैकी ५९.९०% शाळा सरकारी आहेत, मात्र केवळ २३.६८% विद्यार्थी या शाळांमध्ये शिकतात.
- **खाजगी क्षेत्राचे प्राबल्य:** याउलट, खाजगी अनुदानीत (Private-Aided) शाळांची संख्या २२.५४% असून त्या सर्वाधिक ४५.२७% विद्यार्थ्यांचा भार पेलत आहेत.

- **स्वयंअर्थसहाय्यित शाळांची वाढ:** स्वयंअर्थसहाय्यित (Self-Finance) शाळांचे प्रमाण १४.०७% आहे, पण त्यांची पटसंख्या सरकारी शाळांपेक्षा जास्त (२७.१५%) आहे.

हे आकडे दर्शवतात की सरकारी शाळांची संख्या मोठी असूनही पालकांचा ओढा खाजगी आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांकडे जास्त आहे. सरकारी शाळांची उपयुक्तता आणि आकर्षण वाढवणे हे राज्यापुढील मोठे आव्हान आहे.

## १३. पायाभूत सुविधा; यश आणि त्रुटी:

पायाभूत सुविधांच्या बाबतीत राज्याने काही बाबतीत प्रगती केली आहे, तर काही ठिकाणी गंभीर कमतरता आहेत:

- **स्वच्छतागृहांची स्थिती:** मुलींसाठी स्वच्छतागृहे (९६.८९%) मुलांच्या (९४.८६%) तुलनेत चांगली आहेत.
- **CWSN (विशेष गरजा असलेली मुले) सुविधा:** विशेष गरजा असलेल्या मुलांसाठीच्या स्वच्छतागृहांची स्थिती चिंताजनक आहे. केवळ ५६.४७% मुलांच्या आणि ४९.८१% मुलींच्या स्वतंत्र CWSN स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध आहे.
- **स्वयंपाकघर (Kitchen Shed):** शालेय पोषण आहारासाठी आवश्यक असलेल्या किचन शेडची उपलब्धता केवळ ७३.०२% शाळांमध्ये आहे. विशेषतः खाजगी विनाअनुदानीत (३१.६२%) आणि स्वयंअर्थसहाय्यित (२६.४८%) शाळांमध्ये हे प्रमाण अत्यंत कमी आहे.

## १४. डिजिटल साक्षरता आणि तंत्रज्ञान; मोठी दरी:

राज्यातील शाळांना 'डिजिटल' बनवण्याच्या दाव्यांची वास्तविकता खालीलप्रमाणे आहे:

- **माहिती व तंत्रज्ञान (ICT) लॅबचा अभाव:** राज्यासाठी सर्वात धक्कादायक बाब म्हणजे केवळ ८.६९% शाळांमध्ये ICT लॅब उपलब्ध आहेत. सरकारी शाळांमध्ये हे प्रमाण तर केवळ ३.६६% इतके नगण्य आहे.
- **स्मार्ट टीव्हीमध्ये सरकारी शाळांची आघाडी:** एक सकारात्मक बाब म्हणजे सरकारी शाळांमध्ये स्मार्ट टीव्हीची उपलब्धता ७०.८७% आहे, जी खाजगी अनुदानीत शाळांपेक्षा (४४.३१%) चांगली आहे.

२१ व्या शतकातील शिक्षणासाठी 'ICT लॅब' आणि 'इंटरनेट' अनिवार्य असताना सरकारी शाळांमधील हे अल्प प्रमाण डिजिटल दरी (Digital Divide) निर्माण करत आहे.

## १५. शिक्षक आणि मनुष्यबळ व्यवस्थापन:

- **शिक्षक-विद्यार्थी वितरण:** खाजगी अनुदानीत शाळांमध्ये ४५.२७% विद्यार्थी असताना शिक्षक मात्र ३६.४७% आहेत. याउलट सरकारी शाळांमध्ये २३.६८% विद्यार्थ्यांसाठी ३०.६१% शिक्षक आहेत.
- **मुख्याध्यापक कक्ष:** केवळ ४८.९३% सरकारी शाळांमध्ये स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष (HM Room) उपलब्ध आहे, तर खाजगी शाळांमध्ये हे प्रमाण ९५% पेक्षा जास्त आहे.
- सरकारी शाळांमध्ये प्रति शिक्षक विद्यार्थ्यांचे प्रमाण चांगले असले तरी, प्रशासकीय सोयीसुविधांच्या (उदा. स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष) अभावामुळे व्यवस्थापनावर परिणाम होऊ शकतो.

**निष्कर्ष:**

महाराष्ट्राचा शैक्षणिक पाया भक्कम असला तरी अहवालातून काही महत्त्वाचे मुद्दे समोर येतात:

१. समावेशकतेचा अभाव: विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी (CWSN) पायाभूत सुविधांमध्ये राज्य खूप मागे आहे.

२. सरकारी शाळांची घटती विश्वासार्हता: शाळांची संख्या जास्त असूनही विद्यार्थी संख्या कमी असणे हे गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

३. डिजिटल पायाभूत सुविधांची विषमता: खाजगी शाळांच्या तुलनेत सरकारी शाळा तंत्रज्ञानाच्या बाबतीत (विशेषतः इंटरनेट आणि लॅब) खूपच मागे आहेत.

राज्याने केवळ शाळांच्या संख्येवर लक्ष न देता, सरकारी शाळांचे आधुनिकीकरण आणि विशेष मुलांसाठीच्या सुविधा सुधारण्यावर भर देणे आवश्यक आहे.


(स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६, यूडायस+ अहवाल, २०२४ -२५)

# शालेय शिक्षण विभाग

सामाजिक आणि आर्थिक विकासाची प्रगती सुककर करण्यासाठी शिक्षणाचे महत्तव सर्ववामान्य आहे. शिक्षणामुळे वैयक्तिक आणि सामूहिक नावलौकिक मिळविण्याच्या संधी उपलब्ध होतात. लोकांना कौशल्य व ज्ञान मिळवून देऊन त्यांना उत्पादक रोजगारीची संधी मिळवून देणे आणि पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी तसेच युवकांचा सर्वांगीण विकास होण्यसाठी शिक्षण हे एक अत्यंत निर्णायक साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीचे केवळ लेखन व वाचन संस्था विकसीत करणे एवढेच अपेक्षित नसून व्यक्तीमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करून, परिपूर्ण व्यक्तिमत्तव घडविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत सामाजिक पायाभूत सुविधा (Sovcial Infrastructure) निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक पायाभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो. तशीच गती शिक्षणाचा समावेश असणाऱ्या सामाजिक पायाभूत सुविधांवर करणे क्रमपात्र ठरते.

## मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाच्या एकूण अर्थसंकल्पात सरासरी खर्च केवळ रु. ६१ हजार कोटी!

*आलेख क्र. १.* *(रु.कोटीत)*





| | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ५१५६५ | ६०६०६ | ६१३१६ | ६२८१७ | ६६८८६ | ७३६६६ | ८१३३५ | ८६२२० | ८९२४० |
| सुधारीत अंदाज | ४८४७८ | ५७९४४ | ५५५९० | ६०१४६ | ६९३०८ | ८०७६५ | ७८५८७ | ८०४०८ | |
| प्रत्यक्ष खर्च | ४४३८० | ५४८१० | ५३७८६ | ५८८१२ | ६८४३७ | ७७४२७ | ७४९९० | | |

*(स्त्रोत : वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा) टीप: वर्ष,* २०२४-२५ प्रत्यक्ष चे वर्ष २०२५-२६ चे *सुधारित अंदाज व वर्ष* २०२५-२६ चे *अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **सन २०१८-१९ ते सन २०२४-२५ या मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च हा ६१ हजार ८०६ कोटी रुपये इतका झाला.**
- **गेल्या ७ वर्षात अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत प्रत्यक्ष सरासरी खर्च हा ३ हजार ६४९ कोटी रुपये कमी झाला आहे.**
- **मागील ७ वर्षात एकाही वर्षी अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च झालेला नाही.**

# गेल्या ७ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर झालेला खर्च ५४.४३% आहे !

आलेख क्र.२





*(स्रोत: खर्चाचा प्रधानशीर्ष नि विभागवार सारांश व लोकलेखा, अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*

*टीप: वर्ष* २०२४-२५ प्रत्यक्ष खर्च, वर्ष २०२५-२६ चे *सुधारित अंदाज व* २०२६-२७ चे *अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **शिक्षणावर होणाऱ्या खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा खर्च सन २०२५-२६ च्या सुधारित अंदाजानुसार ५७.२६% होता, त्यात सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये घट झाली असून हा खर्च ५६.७९% आला आहे. ही घट ०.४७%इतकी आहे.**
- **सन २०१८-१९ ते सन २०२४-२५ या ७ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा सरासरी खर्च केवळ ५४.४३% राहिला आहे.**
- **गेल्या ७ वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी सर्वात कमी निधी सन २०२१-२२ मध्ये ५३.०२% उपलब्ध झाला तर सन २०२५-२६ मध्ये सगळ्यात जास्त ५७.२६% निधी खर्च झाला.**
- **मात्र मागील ७ वर्षात प्राथमिक शिक्षणाचा खर्च प्रत्यक्षात एकही वर्षी ६०% पेक्षा जास्त झालेला नाही.**

# राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सर्वसाधारण शिक्षणावर झालेला सरासरी खर्च १४.६८% !

*आलेख क्र. ३*





*(स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
*टीप: वर्ष २०२४-२५ प्रत्यक्ष खर्च, वर्ष २०२५-२६ चे सुधारित अंदाज व २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **राज्य अर्थसंकल्पा पैकी सर्व साधारण शिक्षणावर मागील ७ वर्षात सरासरी १४.६८% निधी उपलब्ध झाला.**
- **सर्व साधारण होणाऱ्या खर्चाचा आलेख पाहता असे दिसते की, शासनाने सन २०१९-२० मध्ये सर्वात जास्त १५.६०% इतका खर्च केला होता तर सन २०२४-२५ मध्ये तो खर्च सर्वात कमी १२.९३% इतका होता.**
- **सन २०२५-२६ चे सुधारित अंदाज पाहता, राज्य अर्थसंकल्पा पैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च ११.१० % इतका कमी होणार असे दिसत असून तो आत्तापर्यंतचा सर्वात मोठा निचांक असेल.**
- **राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर झालेला खर्च सन २०१९ मध्ये सर्वात जास्त असून तो २.६०% इतकं मोठा होता, जो गेल्या ७ वर्षातील उच्चांक आहे.**

# सर्वसाधारण शिक्षण व तंत्रशिक्षणावरील खर्च

## राज्य स्थूल उत्पन्नाच्या केवळ १.९२ टक्के!

*आलेख क्र. ४*




*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*

*(टीप: शिक्षणावरील एकूण खर्चात २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण यांचा समावेश आहे)*

*(टीप: वर्ष वर्ष २०२४-२५ प्रत्यक्ष खर्च , वर्ष २०२५-२६ चे सुधारित अंदाज व वर्ष २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **शिक्षणावरील खर्च (२२०२), सर्व साधारण शिक्षण व (२२०३) तंत्र शिक्षण या शीर्षांच्या च्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण सन २०१८-१९ ते २०२४-२५ पर्यंत सरासरी २.१७% इतके होते.**
- **सन २०२३-२४ मध्ये सर्व साधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण २.२० % इतके होते मात्र त्यानंतर त्यामध्ये सातत्याने घट होताना दिसत आहे.**
- **सन २०१८-१९ मध्ये सर्व साधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर खर्चाचे प्रमाण १.९१ % इतके कमी होते, त्यानंतर ५ वर्षांनी पुन्हा कमी होऊन वर्ष २०२४-२५ मध्ये त्याचे प्रमाण १.९०% वर आले आहे.**
- **स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावर झालेला खर्च २०१९-२० मध्ये सर्वात जास्त असून तो २.६०% इतका मोठा होता, आत्ता पर्यंतचा तो उच्चांक आहे.**

*****